
# घोड्यापुढं गीता

विश्वनाथ खैरे



सं
म
त

घोड्यापुढं गीता
संमत प्रकाशन : १०
आवृत्ती पहिली
१६.१२.२०००

**प्रकाशक**
उमादेवी खैरे
संमत प्रकाशन
३७४ सिंध सोसायटी
औंध पुणे ४११००७

**छपाई**
महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय
आर्यभूषण भवन, ९१५/२ शिवाजी नगर
पुणे ४११००४

**मुखपृष्ठ : मुक्ती**

किंमत दहा रुपये

पूर्वप्रसिद्धी : 'नवभारत' ऑगस्ट १९९९
**'ऐकली गीता घोड्यांनी'**

ISBN 81-85280-08-6

विश्वनाथ खैरे

# घोड्यापुढं गीता

एकांकिका

संमत

स्नेहादरांनी आमच्याशी जोडलेल्या
**आशावहिनी - राजाभाऊ जोशी यांना**

# घोड्यापुढं गीता

पडद्याच्या आत मेंढरांचे बेबे चे, कुत्री भुंकण्याचे, घोड्यांच्या खिंकाळण्याचे व एकमेकांच्या मागे धावण्याचे, धनगरणींनी पोरांना धपाटे घालीत कातवल्याचे आवाज येतात. नंतर चारदोन माणसं बोलत चालल्याचा आवाज.

- काय खंडुबा, कुनीकडं हिकडं ?
- कोकनात नव्हं का जायचं बकरी घिउन हिवाळ्यात.
- जागा बदालली आउंदा? अगदी देवळाच्या मागंच यिउन राहिलात ती.
- पूर्वापारच्या जाग्याव पाझरतलाव नाय का झाला. ही जागा बरी हाये निपाळीची. कुनिकडं निघालात येरवाळी ?
- देवळात चाललोय. पुरान चालतंय दोन महिनं.
- एक जागी राहनाराचं बरं असतं. आम्हाला कुठं काय देवाधर्माचं ऐकायसवराय मिळतंय.
-गूंधूळ घालताच की.
- ति काय तुमच्यावानि हाये का? पोरंसोरं करत्यात कायनूबायनू. आउंदाच्याला काय घोडी नाचवायचाच नाद धरलाय.
-बाबुराव, चला. नका हितंच गप्पा मारीत बसू.
-चला. बरंय खंडबा. या लौकर माघारी.

अरंगाच्या (रंगमंचाच्या) मध्यावर पडद्यापासून जवनिकेच्या एकतृतीयांश अंतरावर पुराणिकबुवा पाटावर बसले आहेत. त्यांच्यासमोर चौरंगावर महाभारताची पोथी आहे. बाजूला धूप जळल्याचा सुगंध आहे. बुवा पोथीच्या पानांची खालवर करतात, सुहास्य मुद्रेने समोरच्या श्रोत्यांकडे पाहतात आणि आत्मविश्वासपूर्वक आख्यानाची सुरवात करतात.

**पुराणिक** (डोळे मिटून, छातीशी हात जोडून) : मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिं । यत्कृपा तमहं वन्दे परमानंदमाधवम् । ओऽम् नमो भगवते वासुदेवाय । मूका करी जी वाचाळ लांघवी गिरि पांगुळ। कृपा ज्याची तया वन्दे परमानंदमाधवा। त्या श्रीकृष्ण भगवंताच्या कृपेने येथवर मजल गाठली. त्याच्याच कृपेने हे महाभारताचे आख्यान आपण पुरे करणार आहोत. महाभारताची कथा म्हणजे भगवान श्रीकृष्णाच्या गोकुळातल्या गाईंच्या गोरसासारखी. पहिल्या धारेपासून रुचकर, मधूर, पुष्टी तुष्टी आणि शांती देणारी. तरी गोरसाच्यासुद्धा नाना परी असतातच ना. निरसे दूध, भाकरीसारखी साय आलेले चुलीवरचे दूध, घट्ट झालेले वड्या पाडण्यासारखे दही, ते घुसळून काढलेले पांढरेशुभ्र लोणी..जाऊदे..कुणीकुणी मंडळी त्या गोरसाच्याच चिंतनात रंगून गेली तर..महाभारताचं नवनीत म्हणता येईल असं जे आजचं आख्यान लावायचं आहे त्याला ती मुकतील.

तर, काल आपण ऐकलं की आंधळ्या धृतराष्ट्राची इच्छा पुरवण्यासाठी भगवंतांनी संजयाला दिव्यदृष्टी देऊन त्याच्यापाशी बसवलं आणि सांगितलं की, कुरुक्षेत्रावर जे काही घडेल ते तू राजाला सांग. भगवंतांची सारी शिष्टाई फोल होऊन उभयपक्षी युद्धाची तयारी झाली, भगवंतांनी पांडवांचा पक्ष घेतला आणि शस्त्र हाती न धरण्याच्या अटीवर, स्वतः भगवंत अर्जुनाच्या रथाचे सारथी झाले. अहो, केवढं भाग्य अर्जुनाचं की प्रत्यक्ष परमेश्वराचा अवतार त्याचा सारथी झाला.

पण विचार करा, मला पामराला वाटत आलं आहे की अर्जुनापेक्षासुद्धा यःकश्चित प्राणियोनीतले त्याचे घोडे अधिक भाग्यवान होते. (अरंगाच्या दोन्ही पाखांतून [विंगांमधून] घोड्यांच्या टापांचा आवाज येतो.) अहो, ज्यांच्या कपाळी हलक्या जातीतल्या सूतांचे फटके खाण्याचं लिहिलेलं होतं, (घोड्यांच्या खिंकाळण्याचा आवाज).. त्यांच्या पाठीवर रोज रात्री भगवंतांचा हात फिरावा.. काय ही लीला! चौऱ्याऐंशी लक्ष योनीत हिंडून मानवयोनीत जन्म घ्यायचा, तप, साधना, भक्ती करायची अन मऽग कुठं मुक्तीची वाट बघायची..त्याऐवजी नीचयोनीत जन्म घेऊन खुद्द भगवंताकडून सेवा घ्यायची याला केवढं भाग्य लागलं असेल! (घोड्यांच्या प्रेमालापांचा आवाज)..मला कुणी निवड करायला दिली तर मी म्हणेन परमेश्वराच्या आधी त्या परम भाग्यवंत अश्वांचे दर्शन मला अभाग्याला व्हावे..

(दोन्ही पाखांतून दोनदोन घोडे टाप टाप धावत येतात आणि पुराणिकाच्या दोन बाजूंना उभे राहतात. पुराणिकांची धांदल उडते. हे काय झालं त्याला कळत नाही. तो पळून जायला पाहतो, तर दोन्ही बाजूनी एक एक घोडा आपलं तोंड त्याच्या मागं नेऊन त्याला अडवतो. पुराणिकाच्या डाव्या बाजूचा घोडा प्रेमानं आपली हनुवटी त्याच्या मानेवर घासायला लागतो. उजव्या बाजूचा घोडा जुळलेले दात

उघडे करून आनंदाचे आवाज करतो. पुराणिक मात्र लटलट कापत आहे. तेवढ्यात, पुढे असलेल्या दोघांपैकी उजव्या बाजूचा घोडा बोलू लागतो.)

**घोडा** : वत्सा, भिऊ नको. (पुराणिक त त प प करीत बोलायला पाहतो.) तुझं अभाग्याचं भाग्य उजळलं असताना, भित्र्या भागूबाईसारखा भागतोस कशाला ?

**पुराणिक** : म्हणजे ? तुम्ही..

**घोडा** : काय आम्ही ?

**पुराणिक** : तुम्ही ते आहांत?

**घोडा** : कोण ते ?

**पुराणिक** : भगवंताचे, अर्जुनाच्या, रथाचे घोडे आहात?.. खरंच?

**घोडा** : 'खरंऽच ?' कोणतं युग होतं त्यांचं? कलियुग?

**पुराणिक** : नाही, नाही. कलियुग अजून सुरू व्हायचं होतं..

**घोडा** : तरी आम्हाला 'खरंऽऽच' म्हणून विचारतोस?

**पुराणिक** : (एकदम लवून, अपराधाची क्षमा मागण्याचा नमस्कार करीत) नाही महाराज, विश्वास माझाच माझ्यावर बसेना.. आपल्यावर नव्हता अविश्वास दाखवायचा.. (आपल्यावरची बला लोकावर ढकलण्यासाठी बोलतो..) ह्या जमलेल्या मंडळींना विचारा -

**घोडा** : त्यांना काय विचारा? आम्ही कोण म्हणून? (प्रेक्षकांकडे मोर्चा वळवीत) मंडळी, सत्ययुगातल्या कथा रोज तुम्हाला सांगणारे हे. यांना आम्ही ओळखू येत नाही, तर तुम्हा आयक्या मंडळींना कसे ओळखू येणार. स्वतः भगवंताने तक्रार केली होती अर्जुनाकडं की, माणसाच्या कुडीत अवतरलेल्या मला, हे भांबावलेले मानव ओळखत नाहीत. ती आम्ही त्याच्या तोंडून आमच्या कानांनी ऐकली आहे. आमचीही तीच अवस्था आहे. म्हणून आमची ओळख आम्हीच आता तुम्हाला करून देतो.

(घोडा चार पावलं पुढं येऊन प्रेक्षकांच्या समोर उभा राहतो. त्याच्या जवळचा दुसरा घोडा पटकन त्याच्याच प्रमाणे उभा राहतो. पुराणिकाच्या बाजूचे दोघे घोडेही त्यांच्या मागेच उभे होतात. कवायतीच्या शिस्तीनं सारी रचना होते. चारीजण रथाच्या जुवांना जोडल्यासारखे दिसतात. पुराणिक आपलं उपरणं सावरीत सुटकेच्या बरोबरच कुतूहलाच्या मुद्रेने काहीशा सुरक्षित अंतरावर उभा राहतो. डाव्या बाजूचा घोडा पुन्हा बोलू लागतो.)

**घोडा** : तर आम्ही चौघे भगवंताचे घोडे. अर्जुनाच्या रथाचे अश्व. माझं नाव -

**पुराणिक** (महाभारताचा आपला व्यासंग दाखवतो) : बलाहक.

**घोडा** (त्याच्या चोंबडेपणाने अस्वस्थ झाल्याचे दाखवतो) : ते तुझ्यासारख्या कथेकऱ्यांनी दिलेलं नाव. आमची आम्ही दिलीघेतली काही नावं असतील की नाही.

**पुराणिक** : क्षमा करा. आपण भगवंताचे अनुग्रहीत. त्या अवस्थेतली आपली नावं ग्रंथावरून आम्हाला माहीत. पूर्वाश्रमीची नावं असतीलच..

**घोडा** : (पुराणिकाला जरा करड्या आवाजात) आमची ही नावं तशी उत्तराश्रमीचीही आहेत. (प्रेक्षकांकडे) मी काय म्हणतोय ते नंतर हळू हळू कळेल तुम्हाला. तूर्तास..एवढंच समजून घ्या.. माझं नाव.. एऽकऽ. काय?..(मान जराशी कलवून बाकी तिघांनाच कळेल असा इशारा करतो.)

**तीन घोडे** : एऽक.

**एक** : (प्रेक्षकांना) आलं ना ध्यानात? एऽक. (घोड्यांना) आता तुमची पण नावं कळूद्या यांना.

**घोडा** : मी दोऽन्. (रुबाबात पाय आपटीत) दन् दन् दोऽन्. (मान अजिबात न लववता झोकात आपल्या जागेवर जातो.)

**घोडा** : (सगळ्या प्रेक्षकांचा अंदाज घेत, मऊ आवाजात) मी आपला तीन. (मान तीनदा वरखाली करतो.)इन मिन, तीऽन. (अंग चोरीत मागे जातो.)

**घोडा** : ( पहिल्या तिन्ही घोड्यांकडे नजर टाकीत, ताकदीने पण दबत येतो.) मला च्यार म्हनत्यात. (आपलं काही चुकलं नाही ना याची चाचपणी तिघांकडून करीत मागे जातो.)

**पुराणिक** : (मागे जाणाऱ्या चार ला) च्यार म्हणजे चार नाव ना तुमचं?

**एक** : (पुराणिकाकडं त्रासिकपणं पाहतो.) भगवंतानी आम्हाला एकत्र आणलं. मी द्वारकेचा. मथुरेहून आलेल्या गौळवाड्यात माझे आईवडील मरेपर्यंत राहिले. मला सांदीपनींच्या आश्रमात काही वर्षं ठेवलं होतं. तिथं माझ्यावर जे संस्कार झाले त्यांच्यामुळं मला एक हे नाव मिळालं.

**दोन** : आमचं घराणं गांधारातलं. महाराणी गांधारींच्या स्त्रीधनात मी आलो. माझा बांधा आणि शक्ती पाहून अर्जुनानं मला स्वताकडं घेतलं. अर्जुनाची शिकार माझ्यावाचून व्हायची नाही. पुढं मग श्रीकृष्णानं रथाची धुरा माझ्या खांद्यावर दिली. गवताळ कुरणात चरायला जाण्यापेक्षा रक्ताळ रणात लढायला जाण्याचा आनंद, अधिक व्हायचा मला. (एक च्या बरोबरीनं रांगेत उभा राहतो.)

**तीन** : चेदि देशाचे नगरशेट गडगंज मालाचे तांडे दाही दिशांना पाठवीत. त्यांच्याबरोबर शिंगरू असताना मी फिरलो. एकदा हस्तिनापुराला आलो असताना नकुलदेवांच्या मनात मी भरलो. हवं तेवढं द्रव्य घ्या पण याला मला द्या असा त्यांनी व्यवहार केल्यामुळं,मी पांडवांच्या पागेत शिरलो. (दोन च्या पलीकडे थोडी जागा सोडून उभा राहतो.)

**चार** : सूतांची जात मंजे रथ चालवनारांची. त्यांच्यातल्या येकानि बाला न् आईला

पाळल्यालं. मला वळान तसं चांगलं लावल्यालं. पन सूतवाड्यात मन रमाना. पहाटऽच यकदिशि पळालु. भीमदादांनी कानाला धरुन पागऽला बांधलं. जुवाला खांदा लावला की यकटाच रथ वढायचो. त्याच्या ह्यानि किस्नातानि पुठ्ठ्यावर थाप मारली. (तीन पासून बऱ्यापैकी जागा सोडून पाय चाळवीत उभा राहतो.)

**एक** : पुराणीक, पटली ना सगळ्यांची ओळख? (पुराणिक संमतीची मान हलवतो.) तर मग करा तुमच्या आख्यानाला सुरवात. मघाशी अर्जुनाच्या घोड्यांचं पाघळून वर्णन केलंत. ते ऐकलं म्हणून आत आलो आम्ही. तुमची काही अडचण होऊन देणार नाही. (त्याला वाट देण्यासाठी थोडे पांगतात.)

**पुराणिक** : (पाटाकडे जात नाही.) नको, बसायला नको. आपल्यासारख्यांच्या समोर पाटावर बसायचा उद्धटपणा मी करणार नाही. उभ्यानंच आख्यान लावतो. पुराणाचं कीर्तन होईल, अधिक काही नाही. अन पुढं पोथी असायचीही गरज नाही.

**दोन** :पोथी समोर असली तरी तुम्ही मनचं पण काहीही जोडताच की. श्रीकृष्णाच्या घोड्यांचं नाहीका, कुठं काय लिहिलंय पुराणात?

**पुराणिक** : (ओशाळवाणं हसतो.) लोकांना देवभक्तीला लावावं म्हणून सांगावं लागतं काही काही. (खालच्या आवाजात) अन् दुसऱ्या कथेकऱ्यांच्या वऽर कडी करावी लागते कधीमधी.

**एक** : उभ्यानं तर उभ्यानं. चला करा सुरवात.

(चारी घोडे पुन्हा रथाला जोडल्यासारखे, अरंगाच्या कर्णरेषेवर उभे राहतात. पुराणिक उपरणं ठाकठीक करून त्याच्या पदरानं तोंड पुसून सुरवात करायला पाहतो.)

**पुराणिक** : (मघाचा आत्मविश्वास हरवलेला. काही अस्फुट पुटपुटत घोड्यांकडेच नमस्कार करतो.) देवा, चुकत माकत सांगेन ऐकून घ्यावे. वेडेवाकडे बोलेन, गोड करून घ्यावे.

**तीन** : आम्ही कसले देव वोऽ. किशनदेवाचे झालं तरी घोडेच -

**पुराणिक** : (दोन्ही गालांवर चापट्या मारून घेत) नाही नाही देवा ! देवाचे भक्त -

**चार** : (तीन जवळ पुटपुटतो) भक्तऽ? फटक्यांचे धनी फक्तऽ !

**पुराणिक** : (घोड्यांकडून प्रेक्षकांकडे वळत, हात हवेत फिरवतो. आता त्याचा स्थायी भाव जागेवर येऊ लागतो.) तर, महाराजा, जेहेत्ते कालाचे ठायी, दोन्ही डोळ्यांनी आंधळा, राजा धृतराष्ट्र संजयाला म्हणाला, बोल, काय झालं कुरुक्षेत्रावर. मंडळी, संजय मोठा चतुर होता. राजाला काय ऐकावंसं वाटतंय त्याला माहीत होतं. त्याच्या लेकांच्या बाजूची मोठी मोठी नावं त्यानं धडाक्यानं सांगितली.. भीष्म, द्रोण, कर्ण, कृप..

**दोन** : अश्वत्थामा सांगा. अश्वाच्या ताकतीचा माणूस..

**एक** : ब्राम्हणपुत्र असून.

**चार** : घोड्यांच्या घराण्याचं नाव क्येलं. (खाटकन टाप वाजवतो.)

(पुराणिकाला अशा विक्षेपांची सवय नाही. त्याची चुळबूळ होते. पण तेवढ्यात, आलिया भोगासी सादर होऊन तो मोहरा बदलतो.)

**पुराणिक** : देवा, असंच चुकलं माकलं सुधारून द्या.. संजय म्हणाला राजा, भीष्म आजोबांनी सिंहासारख्या आवाजाचा शंख फुंकला.. ततः श्वेतैर् हयैर् युक्ते महति स्यंदने स्थितौ- नंतर पांढऱ्या शुभ्र चार (घोड्यांकडे हात दाखवतो) घोड्यांच्या रथात बसून..

**एक** : आम्ही, आम्हीच होतो त्या रथाला. पांढरे शुभ्र चौघेजण. (त्याचे डोळे चमकतात.)बघत राहायचे सारे लोक. (चौघेही अज्ञात शक्तीनं भारल्यासारखे, रथाच्या धुरांना नेट लावल्याचा अभिनय करतात.) केवढा रथ तो. पण भिंगरीसारखा पळवायचे आम्ही.

**दोन** : आम्ही दोघं पुढे. आपोआप लोक वाट करून द्यायचे. स्वतः श्रीकृष्णानं तुरे खोवलेले असायचे आमच्या डोक्यात..अन ते तुरे हिंदकळायचे आमच्या चालीनं.

**तीन** : बहुतेक भार पेलायचे आम्ही दोघे, मागची धुरा आमची.तराजूच्या दांडीसारखी सरळ. तिला खांदा देऊन दोनदोन कोस धावलो तरी खूर भुईला टेकायचा नाही. चार घोडे ,दोन वीर, एक रथ, सातजण एक होऊन जायचे..

**चार** : अन रथावला मारुती? (पुराणिक चारच्या आठवणीचं कौतुक करतो.) त्यो आठवा. त्यालाबि आठवा. आम्हाला कुठंबि पाठवा, धुमाट रथ न्यायाचो. लगाम मंजी तोंडातला दागिना. कासऱ्याची वादी अंगाला लागिना. कधीतरी बसला किस्नाताचा फटका, की दिलाच बघा रथाला झटका..

(पुराणिकही या आठवांच्या धारेत वाहावून हाताने रथ चालल्याचे दाखवीत आहे. एक-दोन-तीन-चारांची चाल धाव होते आणि हळूहळू मंद होऊ लागते. पुराणिकाला पोथीतला कथाभाग आता सलगपणे सांगणं कठीण व्हायला लागलंय. घोड्यांची चाल कमी होताना पाहून तो प्रेक्षकांकडे वळतो.)

**पुराणिक** : जेहेत्ते कालाचे ठायी, तो महावीर अर्जुन रथात आहे, खांद्यात ते प्रचंड टणत्कार करणारे गांडीव धनुष्य आहे, पाठीवर अक्षय बाणांचा भाता आहे, छाती फुगली आहे, दंड फुरफुरताहेत- असा तो अर्जुन,, आपल्या सारथ्याला म्हणजे प्रत्यक्ष भगवंताला सागतो आहे, कृष्णा, रे अच्युता, (चालीवर) दोन्ही सैन्यांमधे माझा रथ नेऊनि थांबव। (थांबव शब्द ऐकताच चारी घोडे एकदम थांबतात. पुराणिक खूष होतो.) आणि (घोड्यांकडे हात करून) यांचा तो रथ भगवंतानी दोन्ही

सैन्यांच्या मधे थांबवला..आणि अर्जुनाला म्हणाले.. बघून घे हे सारे कौरव, जमा झालेले लढायला. अर्जुन ताडकन उभा राहिला, एकच नजर त्या सेनेवर टाकली, आणि त्या अठरा अक्षौहिणी सैन्यात त्याला दिसले..वडीलधारे, सोयरेधायरे, आजे नातू, मामे काके, गुरू सखे.

**तीन** : नाही दिसले त्याला..जे दिसले आम्हाला..(पुराणिक धक्का बसल्यासारखा थांबतो.) वडीलधारे आमचे, मामे काके सखे.. अकरा लक्ष ऐंशी हजार नउशे ऐंशी फक्त.

**पुराणिक** : (काय बोलावं हे न समजून) मी नाही समजलो..

**एक** : (तीनकडे तिरप्या नजरेने पाहत) समजेल हळू हळू. चालू द्या तुमचं.

**तीन** : हो, चालू द्या.

**पुराणिक** : (चेहरा जरासा उतरलेला) आणि ते सारे पाहून अर्जुनाचा गळाठा झाला..तोंडाला कोरड, अंगाला घाम, गळाले धनुष्य.. म्हणतो, (रडक्या आवाजात) कृष्णा, कसे रे यांना मारू? कसं हे पाप करू? कुलक्षय होईल, संकर होईल, पितर सारे जातील नरकात, त्यांना कोण देईल पिंड न् पाणी..

**दोन** : मुलगे नसतील. मग करतील, मुलगा व्हावा म्हणून, अश्वमेऽध. (एक त्याच्याकडं बघतो.) चालू द्या तुमचं.

**पुराणिक** : (ही पिडाच झाली असा भाव) नाही, तो अश्वमेधाचं नाही बोलला.

**दोन** : बरोबर. तो नाहीच बोलला. मी मनातल्या मनात बोललो..होतो.

**पुराणिक** : (आपण जिंकल्याच्या खुषीत) अर्जुनाला कुणाच्या मनातलं बोलणं नको होतं, भगवंताचा उपदेश हवा होता. म्हणून तो बसला त्यांच्या पायाशी. (चेहऱ्यावर स्मित येतं.) श्रीकृष्ण म्हणतात, अर्जुना, अरे हिजडेपणा नको करू..तुला शोभत नाही हे..अरे तुझा धर्म काय ! . लढाई कर, चऽल.

**दोन** : (एकटाच जुवाला जोर लावतो.) पुढाई करायला चाललो होतो. पण हे तिघे जागेवरच, खूर रवून. राहिलो उगी. एवढ्या एवढ्या खुणा कळतात आम्हा घोड्यांना.

**पुराणिक** : कृष्णदेव घोड्याला नव्हते सांगत, अर्जुनाला.

**एक** : पण सरावानं दोघांचीही भाषा कळत होती आम्हाला. आम्हा घोड्यांची बुद्धी काही कमी नसते. म्हणाले की नाही भगवान पुढे, बुद्धौ शरणमन्विच्छ - बुद्धीला शरण जा.

**तीन** : तराजूच्या दांडीसारखी बुद्धी समतोल ठेव.

**चार** : मव्हाच्या गाळात खुतून देउ नको बुद्धी. (थोडा आगाउपणा करून) बुद्धीला शरन जा, चालू द्या तुमचं.

**पुराणिक** : (या चौफेर हल्ल्यानं काहीसा चीत होऊन नकळत हात जोडतो.) अहोऽ त्या अर्जुनासारखं मीसुद्धा तुम्हाला विचारतो, का माझ्या बुद्धीला वांध्यात पाडता? माझं कल्याण होईल असं, एक काहीतरी सांगा.

**एक** :(पुराणिकाची नक्कल करीत) असं अर्जुनानं म्हटल्यावर भगवान म्हणाले, यज्ञ करा.

**दोन** : अश्वमेऽध ! घोडे बळी द्या. चांऽगले जवाऽन..

**तीन** : आधी खुशाल हिंडू द्या, गावोगावच्या शेतात. खाऊ द्या त्यांना, वाटेल ते पीक. होऊ द्या त्यांना, माजलेले बलदंड.

**चार** : काढू द्या बाहेर, लांबलचक - (लांबलचक जीभ बाहेर काढतो आणि कचकन चावतो.. लगबगीने) चालू द्या तुमचं.

**पुराणिक** : (प्रेक्षकांकडे तोंड फिरवून) चालू द्या काय, यांचं तोंड? वाटलं नव्हतं असतील हे इतके धर्मलंड. (सावरून) प्रत्यक्ष भगवंताचे शब्द आपल्या कानांनी ऐकलेले हे हयात्मे.पण करतील काय. श्रीकृष्ण म्हणूनच गेले, -अर्जुना, प्रकृतिं यान्ति भूतानि. आपल्याला समजेल अशा भाषेत सांगायचं म्हणजे, सगळे जातीवर जातात. यांनी यांचा धर्म पाळला, आम्हाला आमचा पाळला पाहिजे. तर, पुढे चलू या. भगवान त्या कुंतीच्या पुताला म्हणाले, अर्जुना, हा कर्मयोग मी पहिल्या प्रथम विवस्वानाला म्हणजे सूर्याला सांगितला. (एक आणि चार ऐकू येण्याएवढ्या मोठ्यानं हसतात. पुराणिक काहीसा चिडून बोलतो) यात काय झालं हसायला? नव्हतं म्हणाले असं? ऐकलं होतं ना तुम्ही?

**एक** : (शांतपणे) म्हणाले होते. आम्ही ऐकलं होतं. म्हणूनच हसलो.

**चार** : ( खोडकर पोराच्या अभिमानानं) तवासुधा हसलो व्हतो. किस्नाताला ऐकू नव्हतं गेलं.

**पुराणिक** : आता बरीक हद्द झाली. का असे वागलात?

**एक** : विचार करा.

**चार** : बुद्धीला शरन जा.

**एक** : चार, मला बोलू दे बघू. हा कर्मयोग पहिल्या प्रथम सूर्याला सांगितला. काऽय केलं सूर्यानं तो ऐकून?

**पुराणिक** : (प्रेक्षकांना) अहो, भगवंताच्या बोलण्यातलं रूपक समजून घ्यायला लागतं. सूर्यदेव म्हणजे कर्मयोग्याचं ज्वलंत, (हा शब्द सुचल्याच्या खुशीत) अगदी ज्वलंत उदाहरण! रात्रंदिवस, (एक कडे बघत) हो हो रात्रंदिवस, जगाला प्रकाश देत फिरायचं. (चारी घोडे हसतात त्यामुळे त्याचा ओघ एकदम थांबतो, चेहरा कसनुसा होतो.)

**दोन** : रथात बसून ! लालबुंद गोळा रथावर लादला की संपला त्याचा कर्मयोग !

**तीन** : धनी लोळा, सारथी पांगळा ! रथ निखळ सोन्याचा, त्याचे खिळे चंद्रतारे, दोरसुद्धा सोन्याचे..

**चार** : त्याला अधांत्री पळवायचं, काम मातर घोड्यांचं ! दोन नाही चार नाही सात घोडे लावले। जग जल्मल्यापसून धाव धाव धावले कधीच नाय कावले।

**एक** : म्हणून आम्ही हसलो ! रूपक समजून घ्यावं लागतं ना पुराणीक..रूपकाच्या पोटातलं रूपकही समजून घ्यावं लागतं. चालू द्या तुमचं.

**पुराणिक** : (नाइलाजानं सुरवात करतो) यांनी प्रत्यक्ष ऐकलेलं. आम्ही लिहिलेलं वाचणारे. पोथीत आलं तेवढं सांगणारे. भगवान म्हणाले, तोच कर्मयोग विवस्वानानं मनूला, मनूनं इक्ष्वाकूला सांगितला. भगवंतापासून माणसापर्यंत कर्मयोग आला. पण माणूस म्हणजे बऱ्यावाइटांचा काला. कर्मयोगाचा उपदेश त्याच्यावर सरस्वतीच्या लोंढ्यासारखा आला.. पण कालांतरानं माणसाच्या विस्मरणाच्या वाळवंटात लुप्त झाला.

**एक** : दुसरं होणारच होतं काय? माणसांची सरस्वती जिभेवरून ओघळते. आणि मुळात ज्यांनी कर्मयोग नुसताच ऐकला, आचरला नाही, त्यांच्याकडून शिकल्यावर, शिकणारे तरी कसे आचरणार? कर्मयोग खरा ऐकला तो आमच्या पूर्वजांनी -कारण ते रात्रंदिवस त्याचा प्रकाश जगाला दाखवीत फिरत होते. त्यांच्याकडून जर माणसांनी तो घेतला असता तर भगवंतांना अशी हळहळ करायची पाळी आली नसती, (पुराणिकाला) होय की नाही?

**पुराणिक** : (तोही माणूसच, घोड्याचं म्हणणं ऐकायला जरा जडच जातंय त्याला.) म्हणून, भगवान म्हणाले, हे अर्जुना, आज मी हा योग तुला पुन्हा सांगितला. हे असं त्या परमेश्वराला पुन्हापुन्हा करावं लागतं. परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्..साधूंचे संरक्षण दुष्टांचे निर्दालन, ते करण्यासाठी आणि खऱ्या धर्माची स्थापना करण्यासाठी युगीयुगी मी पुन्हा जन्म घेतो. त्याचसाठी कृष्ण अवतार झाला. त्या अवतारात सद्‌गुणी माणसांना वाचवण्यासाठी आणि दुर्गुणी माणसांचा नाश करण्यासाठी, काय काय म्हणून केलं नाही त्या भगवंतानं..(घोड्यांकडं हात दाखवून..) यांची सेवासुद्धा केली (हे सांगताना सुरवातीचा भक्तिभाव बराच ओसरला आहे.)

**तीन** : फुक्कsट असं वाटतंय ना तुला? (रागानं त्याला पुढचं सुचत नाही.)

**दोन** : अरे मूढा, कारण आम्हीच खरे कर्मयोगी होतो - अजून कळलं नाही का तुला?

**चार** : इराटाच्या दारात अर्जुन आरदनाऱ्यावानी नाचत व्हता तव्हा आन आता हिजड्यावानी बसून राहिला तव्हासुधा आम्ही फुरफुरत व्हतो..

**पुराणिक** : (गर्भगळित) मला तसं काही म्हणायचं नव्हतं तुमच्याबद्दल. ह्या जमलेल्या

मंडळींना कळायला हवं की भगवंताचा जन्म काय कर्म काय दिव्य म्हणजे अगदीच दिव्य असतात. त्यांना हे सगळं माहीत नसतं म्हणून सांगावं लागतं. आता हेच बघा. ह्यांच्यातले कोणीकोणी म्हणतात, कशाला बाबा हे फरक - हा ब्राम्हण, हा क्षत्रिय, हा वैश्य न् हा शूद्र? अरेऽऽ, माहीत नसलंऽ तर माहीत करून घ्या.. स्वता भगवंतांनी सांगून ठेवलंय, (सुरावर) चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः। (एक मान डोलवू लागतो) तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम्। (एक कडे पाहून आपण जिंकली असा भाव व्यक्त करतो.) अरे ही चार वर्णांची व्यवस्था स्वतः भगवंतांनी घालून दिली. आणि कशीऽ? गुणकर्मविभागशः.. ज्याचे त्याचे गुण काय, कर्म काय, विभाग काय सगळं बघून त्याचा वर्ण कोणता ते भगवान ठरवतात. कर्म म्हणजे काम हे तर जाणताच. पण प्रारब्ध कर्मसुद्धा असतं. त्याच्या अनुरोधानंसुद्धा तुमचा वर्ण ठरतो.

**एक** : (एकदा पुराणिकाकडं संमतीनं, मग घोड्यांकडं अधिकारानं, नंतर प्रेक्षकांकडं आत्मविश्वासानं पाहतो.)आणि त्यांनी पुढं सांगितलं, जे आम्ही त्यांच्या मुखातून ऐकलं, ते असं की, अर्जुना, हे सगळं करूनही मी न करणारा असतो हे तू जाणून घे.

**दोन** : कारण ते अर्जुनाला माहीत नव्हतं. आम्हाला आधीच माहीत होतं. (एक चमकतो.)

**तीन** : त्याचं काय आहे, दोन वस्तू तराजूत तोलल्या तर पारडं खालीवर होणारच की नाय? तेव्हा आम्हाला जेव्हा एका दावणीला बांधलं त्यावेळी क्रिश्नदेवानी पागनीसाला समजून सांगितलं होतं.

**चार** : त्यांची भाशा आमाला कळायची अन आमची त्यानला कळायची. तवा ते म्हनले हे बऽघ..हे चारी घोडेच..पन च्यार घरचे च्यार. त्या त्या घरचे वान नाय पन गुन घेउन आल्याले. तवा त्यानला चार नावं द्यायची. बराच खल झाला त्यांचा. पन नुसत्या नावावरनं, ही आता म्हनलं तसं, हलकं भारी कसं व कळायचं? म्हनून म्हनले ह्यानला आकडं द्या.

**एक** : मघाशी म्हणालो होतो की नाही, समजेल तुम्हाला का आमची नावं अशी ते. (पुराणिक मान डोलवतो.) मी सांगितलं ना मी आश्रमात वाढलो. त्यामुळं मला अंक मिळाला एक..

**चार** : (एक ला) ती मागून. पहिल्यानी काय झालं, पागनीस म्हनलं, ज्याचं त्याचं आधी गुन बघा. म्हनुन समद्यांला दुसऱ्या घोड्यांच्या संगं रथाला जूडून पळावलं. तर मी काय कुनाला आवारलो नाय. कसा व आवरंन. ल्हानपनापसून शीकच जर सूत-वाड्यातली, तर पुढंच ऱ्हानार मी समद्याच्या. तवा पागनीस म्हनलं, ह्याला मागल्या जोट्याला जुपा. आन म्हनले ह्याला पैला म्हना. तिनबा झाला दुस्रा, दोनबा

मंग तिस्रा आन येकाजी झालं चवथा. (एक चा चेहरा उतरतो.)

**एक** : नंतर कृष्णदेव आले आणि ही नावं त्यांनी ऐकली. ज्यांनी स्वतःच सारी व्यवस्था माणसांनासुद्धा घालून दिली होती, त्यांना ही नावं चांगलीच खटकली. ते काय म्हणाले ते सांगितलं तर, पुराणीक, आत्मस्तुतीचा दोष येईल माझ्यावर.

**दोन** : नका घेऊ तो दोष तुमच्यावर. श्रीकृष्ण म्हणाले, अहो, वर्णानां ब्राह्मणो गुरुः। तर असं गुरूच्या घरी वाढलेल्या घोड्यालासुद्धा 'चवथा' म्हणायचं बरोबर नाही होणार. त्याची पायरी अशी खाली आणून नाही चालणार.

**तीन** : तेव्हा त्यांनीच सुचवलं, असं करा. त्यांना नावासाठी अंक द्या, क्रमांक देऊ नका. म्हणजे चौथा होईल एक, तिस्रा होईल दोन, दुस्रा म्हंजे मीच की झालो तीन

**चार** : मी पहिला होतो त्यो झालो चार. करमाचा आकडा गेला अन ह्यो आकडा कर्माला आला.

**एक** : चार, अजूनी तुला नीट समजलं नाइये असं मला वाटतं. धुरेची जागा तुझी तीच राहिली, हो की नाही!

**चार** : राहिली ना, समदं वझं वढायला.

**तीन** : सगळं नाही बरं का चार! अर्धं ओझं मी ओढतो.

**दोन** : तुझ्यापुढं मी असतो, तो काही नुसता नावाला नाही. मी पण ओढीत असतो. अन लक्षात ठेव, शत्रूचे बाण येतात, माझ्यावर. तुमच्या रक्षणाची जबाबदारी निभावतो तो मी.

**एक** : अन चार, तू सारथ्याच्या सगळ्यात जवळ असतोस. पुठ्ठ्यावर थाप मिळते ती तुला, मला नाही. पुढं राहून दिशा देतो मीच. समजा, मी अडेलतट्टू झालो..काय होईल तू आटापिटा करून?

**चार** : पुठ्ठ्यावर थाप ! हूँ: सारथ्याची थाप कवाकवाच मिळती, तुझ्या भुलथापा मातर पहिला झालतो तवापुन ऐकल्यात. आधी माझी जागा पागनीसानी उजव्या हाताला ठरावली व्हती, हाय का नाय? तू काय म्हनलास? 'चार, अरं उजव्या बाजूला राहिलास तर थाप पडंल डाव्या पुठ्ठ्यावर. तसं कशाला, तू ये माझ्या मागं. मंग उजव्या पुठ्ठ्यावर यिईल थाप.' मला खरं वाटलं. तुला, ताकतीचा वढनार तुझ्या मागं पायजे व्हता म्हनून ही थाप मारलीस तुवा.

**पुराणिक** : (एक ची बाजू उचलून धरली पाहिजे हे जाणवून) छे छे, चार, मी सांगतो काय झालं असेल ते. तू पहिला होतास तेव्हा ज्या दिशेनं मोजावं लागायचं त्याच दिशेनं एक पासून मोजायचं म्हटलं तर तुझी जागा बदलायलाच पाहिजे होती.

**चार** : (आता पुरता गोंधळला आहे) बुवा, जातीला जात वळाखती म्हनत्यात ना तुमच्या मानसांत. तसं तुमचं चाललंय. (उपरोधानं) चालू द्या तुमचं.

**पुराणिक** : (प्रेक्षकांकडे) ऐका मंडळी. मघापासून सांगतोय मी, रूपक समजून घेतलं पाहिजे, रथाला दोन घोडेसुद्धा पुरले असते. तरी भगवंतांनी चार का जोडले? रूपक समजून घ्या. हा समाज नीट चालायचा तर त्यात चार वर्ण पाहिजेत..गुणकर्मविभागशः.. समाजरचनेचं ते महान तत्त्व वस्तुरूपानं माणसांच्या समोर उभं करण्यासाठी रथाला चार घोडे लावले. साहजिकच त्यांची जोडणी कशी करायची हा गुंतागुंतीचा प्रश्न झाला. मोजायचं ते उजवीकडून का डावीकडून हाही एक तिढाच होता की नाही. अहो जानवं उजव्या खांद्यावरून घालायचं का डाव्या, असल्या गोष्टी ठरवण्यासाठी शंकराचार्यांच्या समोर शास्त्राधार होतात. हे काय सामान्य प्रश्न आहेत का. प्रदक्षिणा सुद्धा आपण देवाला सुलटी तर मयताला उलटी घालतो. तेव्हा पहिला पहिला का चौथा एक हे ठरवताना करावी लागली थोडी अदलाबदल तर चार नी यवढी खळखळ नाही करू. (एक मान डोलावतो.) उलट त्यानि समजून घ्यायला पाहिजे की माणसातली परिपाठी भगवंतांनी जनावरातसुद्धा आणली.

**चार** : आन आमच्या कपाळाव डाग दिलं. (कपाळ पुढं करून दाखवतो.) बघा..च्यार. मानसांच्या कपाळाव का व डाग देत नाई बुवा?

**एक** : चार, अरे आपण सगळे पांढरे.. ओळखायची काही खूण तर असावी की नाही?

**चार** : आईला कसं वळखू यायचं रं आपुन? तू काई सफाइ देउ नको. किस्नात मस खरारा करायचा आपल्या सगळ्यानला. पन हे सगळं फोडाफोडीचं काम त्याचं. वर मधाशी ह्ये म्हनलं तसा, करून सवरून नामानिराळा.

**पुराणिक** : हे असं होतं. शास्त्र नीट समजावून सांगायला गेलं तर माणसांनासुद्धा नीट कळत नाही तर घोड्यागाढवांचं काय! (दचकून बोलायचा थांबतो. गडबडीनं मागं सरतो. त्याला काहीतरी दिसलंय. काय ते त्याला समजण्याच्या आत एक घोडी धाडधाड आत येते.)

**घोडी** : ए बुवा, गाढवं कुनाला म्हनतो? ह्या माझ्या लेकरांला? (चारी घोडे माना खाली घालून उभे राहतात.)

**पुराणिक** : (घोड्यांना दमात घ्यायला लागलो नाही तो ही नवीन बला कुठून आली असं वाटून सबुरीनं घ्यायला बघतो. तोंडावर सात्त्विक भक्तिभाव आणून) नाही माउली, हे प्रत्यक्ष पुरुषोत्तमाचे अश्व आहेत हे काय मला माहीत नाही? यांची आई म्हणजे प्रत्यक्ष प्रकृतिमाता. अहाहा, काय प्रकृतीची माया,

**घोडी** : आईची माया लेकरांवर नाय तर काय बुवावर व्हइल का सांग. (त्याच्या तोंडाजवळ तोंड आणीत मोठ्यानं खिंकाळते. पुराणिक गडबडतो. एक त्याला सावरायला बघतो. चार हसतो.)

**पुराणिक** : (हात जोडीत) नाही नाही माते, मीही तुझे एक लेकरूच. माते वडवे, तू स्वतः विवस्वानाची पत्नी, त्यानं कर्मयोग पहिल्यांदा सांगितला. या तुझ्या लेकरांनी तो प्रत्यक्ष आचरून दाखवला म्हणून तो थोडाफार जगात टिकला. (घोडीला हे काही समजत असल्याचे दिसत नाही. हा काकुळतीला आल्याचं पाहून ती काहीशी मवाळते मात्र.) माते वडवे, तुझ्याच पोटात अग्नी वाढला..

**घोडी** : (एकदम खवळते) माझ्या पोटात आग पडायला काय झालंय? भरपूऽऽर खायाला घालतु ना बिचारा. एखांद्याचं खाउनपिउन भलता आळ घिउ नाही कुनावर.

**पुराणिक** : मी पुराणातलं सांगत होतो..

**घोडी** : मीबि कुरनातलंच सांगत व्हती. आउंदा पाऊसपानी चांगलं झालंय. लईऽ चांगलं गवात आलंय. ह्याऽ कारट्यांलाच माज आलाय. चरायचं टाकून पळून आली.

**एक** : (आपलं बिंग फुटतंय असं वाटून) बुवा कथा करतात. कथेत घोड्यांना फार मान दिलाय.

**पुराणिक** : (लगबगीने) हो ना. यांच्या खांद्यावर स्वता भगवंतांनी रथाचं जू दिलं.

**घोडी** : जू? कवा? धनगरांचा सवसार नेत्यात वाहून ह्ये. पन ती टांग्याची घोडी आमच्यातली नव्हत.

**पुराणिक** : (विनोद करायला बघतो.) उस्मानभाईच्या टांग्याचं घोडं नव्हे, अस्मानातल्या देवाच्या रथाचे घोडे ना हे. अहो देवानिच सांगून ठेवलंय, (सवयीनं प्रेक्षकांकडे वळतो) उच्चैःश्रवसं अश्वानां विद्धि माम् अमृतोद्भवम्। अर्जुना, घोड्यांमधे मी उच्चैःश्रवा आहे. समुद्र घुसळून अमृत काढले तेव्हा हा घोडा निघाला..

**घोडी** : आता ग बया ! नवालच झालं. अवं, धनगरनी रोज डेराडेरा ताक घुसाळत्यात त्यातनं घोडमुंगीसुधा नाय निघाली कधी. (चारी घोड्यांची चुळबूळ चाललीये.)

**पुराणिक** : (आपल्याजवळ सगळ्या शंकांची उत्तरं आहेत या विश्वासानं, पण घोडीला टाळून प्रेक्षकांकडे मोहरा ठेवीत) नावसुद्धा कसं बघा.. रूपगुणाला साजेसं. उच्चैः श्रवस्.. म्हटलं तर कान उंच करून, टवकारून कानोसा घेणारा..(चारी घोडे कान टवकारतात. काही धोका आहे असं वाटून घोडीही कान टवकारते. काही नाही म्हटल्यावर कान पाडते. घोडे मात्र हुकमाप्रमाणे सोंग वठवताहेत.) नाही तर, उंच आवाजात खिंकाळणारा (चारी घोडे एकदम खिंकाळतात. घोडी कावरीबावरी होते. पुराणिक खूष.)

**घोडी** : देवावानि गप बसायचं ति खिकाळायला काय झालं तुम्हाला? आं? का वऽ बुवा, कथऽतली घोडी असली कसली खोटी खोटी. खऱ्या घोड्यांची माहिती हाये का नाई तुम्हाला.

**पुराणिक** : नाइ मंजे, घोडं ठेवायचं आम्हाला परवडतंय कुठं. कथेतल्या घोड्यांना केवढा मान आहे हेच मी या तुमच्या पुतांना सांगत होतो.

**घोडी** : सुतात हायेत तवर पुतं न्हायतर हायेत भुतं. काइ घेतलं का तुमचं तरी नीट ऐकून.

**पुराणिक** : काही तसं काही असं. पण मी समजून सांगत होतो त्यांना. आता हाच विषय चालला होता.. एक दुसऱ्याहून वरचढ कशाला?

**घोडी** : ह्ये पुसत व्हते तुम्हाला?

**चार** : मंजी त्याचं काय की मी सगळ्यात थोरला असून -

**एक** : मी सगळ्यात पुढं का?

**घोडी** : आन ह्या ह्यांच्या भांडनात, बुवा, तुमीबि शिंग मूडून शिंगरांत शिरला व्हय?

**पुराणिक** : देवाचे घोडे म्हटल्यावर आम्हाला त्यांची सेवा केलीच पाहिजे. जन्मभर ज्यांची कथा सांगत आलो त्यांचं दर्शन झाल्यावर उल्हास वाटला. तुम्ही आल्यावर तुमचीसुद्धा नाही का भाकना केली.

**घोडी** : (खदखदा हसते) अवं ही यवांढलं घोडं झालं तरी मानसावानि भांडऽत्यात आन तुमी त्यांचं ऐकऽता. ह्ये देवाचं घोडं मंजी काय? तुमच्यासारख्याला मी फसवायची नाय. धनगारांचा सवसार ह्या मुकामावनं त्या मुकामाला न्यायचा असतो ना, तवा त्यांचं द्याव दर बारीला यकाच घोड्यावर लादत्यात. त्यानला म्हनत्यात देवाचं घोडं. मंजी ह्ये द्येवाला वाहून न्हेत्यात ही खरं. पन घोडं ति घोडं आन मानुस ति मानुस. आता, येकयेक धनगरीन नुसती कलाकलाकला करती. मी तशी वागली तर सोभून दिसंल का, सांगा बरं. (उत्तरासाठी थांबते.) सांगा ना.

**पुराणिक** : घोडीमाय, माणसांना तुमच्याइतकं शहाणपण आलं ना, तर आम्हाला कथापुराण करायचीसुद्धा गरज नाही.

**घोडी** : आमच्यात कुठं असतंय व कथा न् पुरान. मीच बघा. चार वर्सात ही चार लेकरं झाली. आझूनबि होतेत. चांगल्या घरी राहिली, देवाची घोडी झाली. चारचार महिने आमच्यासंगं राहिली हेलपाटं घालीत. म्या का ह्यांच्या बापांनी कथा न् पुरानं सांगितल्यात व्हय ह्यानला?

**पुराणिक** : प्रारब्ध कर्म काहीही असलं तरी नित्यकर्म चांगलं मिळालं त्यांना. देवांना वाहून न्यायचं म्हणजे राजयोग घडला यांच्या हातून.

**दोन** : राजयोग ! हुईकात सांगायचे भगत आमच्या भाळी राजयोग आहे म्हणून. कपाळी आला फक्त हा आकडा..(मान थोडी लववून प्रेक्षकांना दिसेल असा आकडा दाखवतो.)

**पुराणिक** : (व्यत्ययाला न जुमानता) देवाला यांनी वाहिलं आणि त्याचं फळ म्हणून

भगवंतांनी सांगितलं, योगक्षेमं वहाम्यहम्.. तुझ्या योगक्षेमाची काळजी मी वाहतो. तुझ्या म्हणजे केवळ दोनच्या नव्हे, तीन आणि चारच्या सुद्धा.

**तीन** : योगक्षेम बरा चाललाय. मायनं नाही का सांगितलं.

**पुराणिक** : (हसून) अहो, नुसता योगक्षेमच नाही..भगवंतांनी त्याच नवव्या अध्यायात असं आश्वासन दिलंय..

**एक** : सांगा सगळ्यांना नीट, त्या आश्वासनातून दोनला न् मला वगळलंय म्हणून.

**पुराणिक** : याचं म्हणणं तेवढं बरोबर नाही. भगवंतांनी, समोऽहं सर्वभूतेषु, मी सगळ्यांना सारखं वागवतो अशी ग्वाही दिली आहे. आणि आश्वासन दिलं आहे - (चालीवर) मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः। स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास् तेऽपि यान्ति परां गतिम् । अर्जुना, अरे, माझ्या आसऱ्याला आले ते खालच्या योनीतले असोत, स्त्रिया वैश्य शूद्र असोत, तेसुद्धा उत्तम गती मिळवतात.

**दोन** : त्या उत्तम गतीतून आम्हाला वगळलंच की नाही मग? माझी गती सगळ्यात जलद असूनसुद्धा.

**पुराणिक** : (कसं कळत नाही याला अशा अर्थाचं हसून) बाबारे, घोड्यासारख्या खालच्या योनीत जन्म मिळूनसुद्धा उत्तम गती मिळणार हे आश्वासन पुरे नाही का तुला? माणसांतल्या स्त्री वैश्य शूद्रांच्या पंक्तीत तुम्हाला बसवलं -

**घोडी** : लग्नाकार्यात घोड्याला पार मांडवापुतोर न्हेत्यात, पन पंक्तीला कसं व बसावत्याल मानसांच्या. पुरनाची पूळीसुधा बाहेर आनूनच तोंडात घालत्यात.

**चार** : बुवा त्या पंक्तीचं सागत नाहीत माय. बायकांलासुधा देव बाप्यासारखंच वागावतो म्हनत्यात.

**घोडी** : कुठलं वऽ. बाप्यापसून बायकांला कष्ट जास्ती, मंजी लईच जास्ती. सरपान काटूक भाकर टुकडा त रोजचंच. आन वर्सा दोन वर्साला लेकरू. लेकरासंगं बकऱ्याकोकराचंबि करायचं. आन पायपिटी? गरवार असली तरच माउलीला घोड्याव बसायला मिळतंया.

**पुराणिक** : त्यांना घोड्याचा जन्म मिळाला असता तर जास्ती सुख लागलं असतं का ? सांगा.

**घोडी** : अडान्याला आडवं लावता व्हय बुवा. म्या म्हनलंय का घोड्याच्या जल्मात सुख लागतंय म्हनून. अवं, ज्याचं जिनं तीच जानं. माझा जल्म रानातल्या कळपातला. योकच दादला सगळ्या घोड्यांला सबर करायचा. अवऽ दुसऱ्या कळपातली सबर घोडी आली तर ह्यो तिला गाभडावायचा. असलं तर नाय ना मानसांच्यात.

**पुराणिक** : माणूस म्हणजे काही झालं तरी वरची योनी.

**तीन** : म्हणून तर घोड्यांच्या वर्र बसतोय.

**चार** : कुनीकुनी वर बसून दुसऱ्या मानसाला घोड्यासंगं पळायलासुधा लावतोय बरं का.
पुराणिक : अरे, शिंगरू नाही का घोड्यासंगं पळत?

**घोडी** : बुवा, शिंगरू जलामल्यादिशीच पळायला लागतंय. मानसाचं लेकरू वर्साचं व्हतंय तवा उभं राहतंय. मानसाला घोड्याच्या मापानि कशाला जोखताय.

**पुराणिक** : जोखीत नाही, मी आपलं उदाहरण सांगितलं.

**तीन** : म्हंजे एक तऱ्हेचं जोखणंच की नाही. आम्ही कायम उभे असतो. झोपसुधा उभ्यानि घेतो. माणसं राहतील का अशी उभी.

**दोन** : अहो, अर्जुनसुद्धा गीता बसून ऐकत होता -

**एक** : अन आम्ही मात्र एका जागी गप्प उभे राहून ऐकत होतो.

**तीन** : पाय अवघडले ते त्या दिवशी.

**चार** : आन मला त त्यातलं कायकाय समजतबि नव्हतं. कट्टाळा यिउन गेला.

**एक** : मला विचारायचंस. मी सांगितलं असतं.

**चार** : भलेऽ. तुला इच्यारायचं, आन किस्नाताच्या हातचा फटका खायचा गडबड केली म्हनून. मधून मधून त्याची थाप मिळत व्हती - उजव्या पुठ्ठ्यावर ! - तेवढी बास व्हती.

**पुराणिक** : अहाहा ! असं समाधान पाहिजे महाराजा. उगाच नाही यांना गीतामृत आपल्या कानांनी पिता आलं. आणि माणसांमधल्या फक्त दोघांना, अर्जुनाला आणि संजयालाच जे पहायला मिळालं ते भगवंताचं विश्वरूपदर्शन, या प्रणियोनीतल्या चौघांना पहायला मिळालं. धन्य होत हे.

**एक** : तेवढं बरीक नाही मिळालं पहायला. अर्जुनालासुद्धा आधी नव्हतं दिसलं, दिव्य दृष्टी मिळाल्यावर दिसलं. आम्हाला कुठं ती दिली होती.

**दोन** : झापडं पण होतीना. नाहीतर आमच्या डोळ्यांना जवळ जवळ सगळ्या बाजूंचं दिसतं.

**घोडी** : थेट मागच्या बाजूला मानूस आलं तर नाही दिसत बरं का. (तिच्या मागच्या बाजूनं एक धनगर चोरपावलांनी येतोय. तिला कल्पना नाही, पण पुराणिकाला तो दिसतो. त्याच्या कपाळावर आठ्या चढतात.)

**धनगर** : (पुढे येऊन घोडीच्या बगलेत लहानसा गुद्दा मारतो.) आता दिसलो का. (घोडीचं मानवी मुख काहीसं शरमतं.) समद्या पाड्यात धुंडून आलो. (घोडे एकदम चपापलेले. त्यांच्याही मानवी मुखांवर गोंधळल्याचे भाव.)कडंच्या वाडग्यात सोंगं खेळतोय म्हनला व्हता.. तिथं पत्त्या न्हाई. ह्या बाजूला आलो तर देवळात वळखीचा आवाज आला. वाईच कानुसा घेतला आन खात्री पटली तवा आत आलो.. तुमी त हितं बुवांला गिन्यान शिकावताय.

**पुराणिक** : शिकलो हो, बरंच काही शिकलो यांच्याकडून. आज गीता घेतली होती आम्ही आख्यानाला. या चौघांनी स्वता ऐकली ना..

**धनगर** : (मोठ्यानं हसतो) शाबास. मंजे बुवा, वाडवडील सांगत आले, गाढवापुढं वाचली गीता. तर तुम्ही, घोड्यापुढं वाचली गीता. त्यानला काय वो. त्यांचा कालचा गूंधूळ बरा होता.

**पुराणिक** : माई, काय म्हणताएत दादा. आल्याबरोबर रागावला होतात माझ्यावर.

**घोडी** : घोड्याच्या जातीचा राग मनाव नसतो घ्यायचा बुवा. आन म्या कुठऽवऽ ऐकली तुमची गिता का शिता.

**एक** : दादा, आपला कालचा गोंधळ तर बराच होता. तो झाल्यावरच आम्ही हे सोंगांचं ठरवलं.

**धनगर** : आरं पन ती सोंगं वाडग्यातच करायची. हिकडं कशाला आलात?

**दोन** : सोंगं बघायला तर कुणी पाहिजे की नाही?

**पुराणिक** : म्हणजे तुम्ही खरे घोडे नव्हेत ?

**धनगर** : तसं म्हनलं तर चांगलं घोडमं झाल्यात. पन ते खरं घोडं वाटलं का काय तुम्हाला?

**पुराणिक** : (बनल्यामुळं थोडा ओशाळलेला) मनाचा खेळ असतो. घरून निघताना मनात आलं, मोठे सुदैवी अर्जुनाच्या रथाचे घोडे, गीता ऐकली त्यांनी. त्याच तारेत होतो, आणि हे चौघे आले. घोडे असून माणसासारखे बोलतात म्हणता, हे खरेच अर्जुनाचे असले पाहिजेत अशी खात्री वाटली.

**तीन** : एवढ्या मोठ्या समाजापुढं घोडेपणात रत्तीभर कसर राहून दिली नाही आम्ही चौघांनीही. आम्हीसुद्धा खूप शिकलो हां तुमच्याकडून.

**घोडी** : चुरुचुरू बोलायला ना. अरं सॉंग घोड्याचं अन ढॉंग देवाचं.

**पुराणिक** : देव वाटेल ते रूप घेऊन येतो माणसापुढं, माई. त्या रूपाच्या, त्या सोंगाच्या आतला देव बघायला शिकलं पाहिजे माणसानि.

**धनगर** : आमच्यात देव स्वताच येतो कि वो मानसाच्या अंगात.

**चार** : म्हनुन तर दादा, आम्ही घोड्यातलं देव आन मानसातून घोडी व्हऊन आलो.

**घोडी** : मी बरीक न्हाई म्हनली मपल्याला देव का दिवि म्हनुन. म्हनली का वऽ बुवा.

**पुराणिक** : तुम्ही कशाला, मीच म्हणालो ना तुम्हाला. तुमच्या गोंधळात खुशाल देवी व्हा आता.

**धनगर** : येडं का काय बुवा तुमी. बायकामानसानी सोंगं घ्यायची असत्यात का ?

**घोडी** : काय म्हनत व्हति मी. बायकांला कोन वागावतंय का सारखं, सांगा.

**धनगर** : वागवू हितुन म्होरं. चला आता. चांदनी उगावली. भुरकुनि दिवसबि उगवल.

मुकाम हलवायचाय. चला निघा. ते साहवं रावसाहेब नाय घावलं अजून. त्यांला सोधलं पायजे. (निघतो.) बरं येतो बुवा. पोरासोरांचं मनावर नका घेऊ. चलारं. व्हा म्होरं. (चौघे घोडे पुराणिकाकडे पाहत निघू लागतात. पुराणिक स्मितपूर्वक त्यांना निरोप देतो.) त्यांच्या बराबरीनं तुमीबि चला वऽ बाइसाब. (घोडी निघते. धनगर सर्वांच्या मागे. तो प्रेक्षकांच्या नजरे आड होण्याच्या क्षणी पुढच्या पाचही जणांचा मोऽठ्याने हसल्याचा आवाज.)

**पुराणिक** : गेले, गुप्त झाले ते अर्जुनाच्या रथाचे घोडे. ज्यांनी भगवंताच्या मुखीची गीता ऐकली. खोटं वाटतंय तुम्हाला? घोड्याचं रूप चढवलेला माणूस घोडा वाटतो की नाही? मग देवाचे गुण चढवलेला घोडा देव वाटायला काय हरकत आहे? असे देव मानलेल्या घोड्यांच्या किती कथा आपण ऐकत आलो, खऱ्या मानीत आलो. मी सारखा सांगतोय, सगळ्यांमधलं रूपक पहा. त्या धनगरदादांनी सांगितलं, तेव्हा आपण त्या घोड्यांचं सोंग ओळखलं. धनगरांना खरे घोडे, खोटे घोडे चटकन ओळखता येतात. आपल्याला नाही येत. कारण आपला घोड्यांचा परिचय नसतो. म्हणून अनोळखी गोष्टींचा परिचय आपण करून घेतला पाहिजे. धनगरदादांना घोड्याच्या सोंगातली मुलं ओळखता आली. पण पुराणिकाच्या सोंगातला मुलगा नाही ओळखला. मीच तो साहवा. निघतो मीही. दादांना आणखी शोधायला नाही लावीत. शिवाय, बुवांचे कपडे न पोथी त्यांना नेऊन द्यायचीय. त्यांना गुंगीत निजवलंय वाडग्यात. उठतीलच दिवस उगवताना. उद्या ते वाचतील तुमच्यापुढं गीता, अर्जुनानं ऐकलेली. आज आम्ही वाचली ती घोड्यांनी ऐकलेली. रामराम.

❑ ❑ ❑

## विश्वनाथ खैरे

### नाटके

एकलव्य

वंशाचा व्यास

युरेका

हिरकनी

घोड्यपुढं गीता

### भाषा-संस्कृती-विचार

द्रविड महाराष्ट्र

मराठी भाषेचे मूळ

अडगुलं मडगुलं

भारतीय मिथ्यांचा मागोवा

ज्ञानेश्वरांचे चमत्कार

वेदातली गाणी

साहित्य मिथ्य माहित्य

अक्षरे

युगाणी

इमराठी गाणी

**घोड्यापुढं गीता**

पुराणिकाला घरून निघताना मनात आलं, 'मोठे सुदैवी अर्जुनाच्या रथाचे घोडे. गीता ऐकली त्यांनी.' आणि ते चौघे आले. घोडे असून माणसासारखे बोलतात म्हणता, हे खरेच अर्जुनाचे असले पाहिजेत अशी त्याला खात्री वाटली. आणि त्यांचा विलक्षण संवाद झाला...

**एकलव्य**

(राज्य पुरस्कार, पु लं च्या आवडीच्या ७५त समावेश)

**वंशाचा व्यास**

**का माता।**

(आकाशवाणीच्या संस्कृत नाटकस्पर्धेत पुरस्कार)

महाभारतीय पुराणकथांच्या या सामाजिक नाटकांच्या परंपरेतील विचारनाटिका.

ISBN 81-85280-08-6